# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : (अ) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे :-**

(१) **मुख्यमंत्री** : "औरंगाबाद महानगरपालिकेने जलवाहिनीसाठी केलेल्या खर्चाच्या तपशीलाची माहिती उपलब्ध नसल्याबाबत" या विषयावरील श्री.सतिश चव्हाण, श्री.संदिप बाजोरीया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.दिपक साळुंखे-पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.एम.एम.शेख वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ४२२४२ ला दिनांक १७ जुलै, २०१३ रोजी सभागृहात प्रश्नोत्तरांच्या वेळी मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** : "आंबोली (ता.सावंतवाडी, जि.सिंधूदुर्ग) घाटात पावसाळ्यात कोसळणाऱ्या दरडीवर उपाययोजना करण्याबाबत" या विषयावरील श्री.दिवाकर रावते, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स. व सर्वश्री.परशुराम उपरकर, राजन तेली, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३०७१४ ला दिनांक २३ जुलै, २०१२ रोजी सभागृहात प्रश्नोत्तरांच्या वेळी सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे :-**

**(१) उप मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा आठवा वार्षिक अहवाल," सभागृहासमोर ठेवतील.

**(२) सामाजिक न्याय मंत्री** : **(अ)** "महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल," सभागृहासमोर ठेवतील.

**(ब)** "शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल," सभागृहासमोर ठेवतील.

**(३) संसदीय कार्य मंत्री** : "विधानपरिषदेच्या सन २०१३ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक ९ डिसेंबर ते २० डिसेंबर, २०१३ या कालावधीत मा.मंत्री / मा.राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण ३३८ आश्वासनांची यादी, तसेच सन २०१३ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण ४६५ आश्वासनांच्या पूर्ततेसंबंधीच्या विवरणपत्रांची यादी," सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम २२८(१) मधील सात दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी."

**चार : सन २०१४-२०१५ च्या अंतरिम अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा. (पहिला व शेवटचा दिवस).**

**पाच : श्री.संजय रामचंद्र पाटील, वि.प.स. यांच्या राजीनाम्याची घोषणा.**

## - मध्यंतर -

**सहा : शासकीय विधेयके :-**

**(अ) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे :-**

सन २०१४ चे वि.स.वि.क्रमांक ६ - महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन विधेयक, २०१४.

**(ब) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१४.**

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१४ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१४.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.